## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (सकाळ)

जा.क्र. १३३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
**दिनांक १४/०३/२०१८**

**१) सिपीआर डीव्हीआर मशिन व सिसीटीव्ही कॅमेरा व नगदी पैश्याची चोरी . :—**

दिंनाक १२/०३/२०१८ ते दिनांक १३/०३/२०१८ चे रात्र दरम्यान यातील फिर्यादी श्याम रामजी दास रावल वय ५५ वर्ष, रा. विरली याचे किराणा दुकानाचे कोणीतरी अज्ञात चोराने समोरील शटर्सरचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन दुकानात ठेवलेली सिपीआर कंपनीची डीव्हीआर मशिन व सिसीटीव्ही कॅमेरा किंमती १०,०००/—रु. व नगदी ६,०००/—रु. तसेच गावातील सुनील चुटे यांचे किराणा दुकानातील नगदी २,०००/—रु. व अरुण दुनेदार यांचे हॉटेल मधील पानठेल्यातुन ५ किलो सुपारी किंमती १६,००/—रु. व नगदी ५,००/—रु. असे एकुण २०,१००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.ऊईके पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिंनाक १३/०३/२०१८ चे ९.१५ वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीला तु टोम्पे का मारतोस, असे बोलुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन विट उचलुन फेकुन मारल्याने ती विट फिर्यादीला न लागता दरवाजा तुटल्याने व जिवाने ठार मारल्याची धमकी दिली, व फिर्यादीला थापडबुक्यांनी मारपीट केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २९४,३३६,३२३,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा.जाधव पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन महिलेला अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिंनाक १३/०३/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील गावातील महिलांनी एक वर्षा अगोदर आरोपी क्र. १ ची दारु पकडुन दिली होती, ती दारु फिर्यादीने पकडुन दिली आहे असे म्हणुन आरोपी क्र. १ हा फिर्यादीचा राग करीत होता यातील आरोपी क्र.१ ते २ हे पवनी वरुन मोटार सायकलने गावातील झेंडा चौकात आले, व फिर्यादी व तिचा पती हे आपले चहापाण दुकानात असतांना त्यांना पाहुण म्हणाले माझ्या जवळ दारुचे बक्से आहेत कोण माझी दारु पकडतो, असे बोलुन अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन जिवाने ठार मारल्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,५०६,५०९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रहांगडाले पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**४)गैरकायदयाची मंडळी जमवुन शासकीय कामात अडथळा निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिंनाक १३/०३/२०१८ चे १२.४५ ते १५.०० वाजता दरम्यान यातील आरोपी क्र. १ ने आरोपी क्र. २ ते १५ व एकुण ८० ते १०० महिला पुरुष यांचे सह सभेला निर्धारीत वेळेच्या नंतर गैरकायदयाची मंडळी नगर परिषद समोरील डांबरी रोडवर जमा करुन जोरा जोरात नगर परिषद मुर्दाबाद अश्या घोषणा व गोंगाट करुन नगर परिषद मधील अधिकारी व कर्मचारी यांचे शासकीय कामात अडथळा निर्माण केला तसेच मा. जिल्हाधिकारी सा. भंडारा यांचे कलम ३७(१)(३) मपोका आदेशाचे उल्लघंन केल्याने फिर्यादी श्रीमती माधुरी मडावी मुख्याधिकारी नगर परिषद पवनी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १४३,१८६ भादवी. सहकलम १३५ मपोका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी चौधरी पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) गैरकायदयाची मंडळी जमवुन थापडाने मारुन पाहुण घेण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिंनाक १३/०३/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी क्र. १ व २ यांचे रो हाऊस लेआऊट असुन त्यामध्ये घटना तारखेला कॉलोनी मध्ये अपुऱ्या सुविधा असल्याने फिर्यादी यांने त्याबाबत अनेक वेळा लेखी तक्रार करुननही नमुद आरोपी यांनी त्याचेकडे दुर्लक्ष केले म्हणुन फिर्यादी व इतर लोकांनी मा. जिल्हाधिकारी साहेब, उपविभागीय अधिकारी साहेब याचे कडे तक्रार केल्याने आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन चर्चा करण्याचे उद्देशाने कॉलेनीचे गेटवर येवुन शिवीगाळ करुन पाहुण घेण्याची धमकी देवुन व गुड्डु बैस याने फिर्यादीस तडजोड का करत नाहीस, म्हणुन गालावर थापड मारल्याने फिर्यादी जसवीरसिंग सरदुलुसिंग कल्सी वय ४७ वर्ष, रा. यशोदा कॉलोनी बेला यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १४३,१२३,५०४,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनी ऊईके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**६) जुण्या भांडणावरुन लाकडी पाठी व पावडयाने मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिंनाक १२३/०३/२०१८ चे २०.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा भाऊ अतुल नरेश मेंढे वय २२ वर्ष, याला जुणे भांडणावरुन लाकडी पाठीने व पावडयाने दोन्ही हाताचे कोनीवर मारुन उजव्या हाताला जबर मार लागल्याने फिर्यादी आकश नरेश मेंढे वय २५ वर्ष, रा. लाल बहादुर शास्त्री वार्ड भंडारा यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन येथे कलम ३२५,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

14.3

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.

## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (दुपार)

जा.क्र. १३४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/०३/२०१८

**१) ट्रकच्या धडकेत पायी महिला जखमी . :–**

दिंनाक १३/०३/२०१८ चे १२.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा त्याची पत्नी आणि साळुभावाची पत्नी सौ. निर्मला शालीकरामजी मरगडे वय ४४ वर्ष, रा. गोंन्ना असे मिळुन आंनदराव लिचडे याचे मुलीचे लग्न कार्यक्रम करीता पायी रोडने आपले साइडने जात असतांना पवनी कडुन भंडारा रोडने जाणाऱ्या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन जखमी सौ. निर्मला शालीकरामजी मरगडे हिला धडक देवुन जखमी केल्याने फिर्यादी वासु गोपीचंद पडोळे वय ५० वर्ष, रा. गोंन्ना यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**२) अज्ञात वाहनांच्या धडकेत इसमाचा मृत्यु . :–**

दिंनाक १२/०३/२०१८ चे २१.०० ते १३/०३/२०१८ चे ०५.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचे वडील भिमराव कारु घरटे वय ७५ वर्ष, रा. उमरवाडा ह सितेपार रोडने पायी जात असता कोणीतरी अज्ञात आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने चालवुन फिर्यादीचे वडीलास धडक मारुन फिर्यादीचे वडीलाचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी अश्वपती भिमराव घरडे वय ४६ वर्ष, रा. उमरवाडा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. सहकलम १३४,१८७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. म्हसकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत इसम गंभिर जखमी . :–**

दिंनाक १३/०३/२०१८ चे ०६.०० ते ०६.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा सासरा जखमी प्रदीप भिमराव कांबळे वय ५७ वर्ष, रा. गिरोला हे रोडाने पायदळ मॉर्नीग वॉक करीत असता यातील आरोपी चालकाने त्याच्या ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन मागेहुन धडक देवुन गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी शिल्पेन्द्र प्रेमदास मेश्राम वय २९ वर्ष, रा. आर्शीवाद नगर गिरोला यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**४) ईलेक्ट्रीक पोलवरील तांब्याची तारेची चोरी . :–**

दिंनाक १३/०३/२०१८ चे ०५.०० वाजता पुर्वी यातील फिर्यादी हे सिनीयर सेक्शन इंजीनीयर उपरी उपसकर कळमना रेल्वे विभागात कार्यरत असुन त्यांना टिपीसी/टिआरडी नागपुर यांनी घटना वेळी फिर्यादीस सिरसी शिवारातील रेल्वे ट्रॅक वरील ईलेक्ट्रीक पोलावरील ९० मिटर लांबीचा तांब्याचा तार किंमती ३०,०००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने सांगीतल्याने फिर्यादी प्रमोद सोविंदा वैद्य वय ५२ वर्ष, रा. सिनीयर सेक्शन इंजीनीयर उपरी उपसकर रेल्वे कळमना यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कुकळे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.